टंचाईग्रस्त गावांतील स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा जून,२०१३ पर्यंत खंडीत न होण्याबद्दल उपाययोजना करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-१०१३/प्र.क्र.०१/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : ७ जानेवारी, २०१३

वाचा : १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बैठक २००८/ प्र.क्र.१५४६/ ऊर्जा- ५, दिनांक २४ जुलै, २००८
२. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.देप्रोअ १३०९/प्र.क्र.६९/पापु-०७,दि.१७/८/२००९
३. शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापाधो-१११२/ प्र.क्र.५०/ पापु-०७, दि. २७ मार्च, २०१२
४. शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-१११२/प्र.क्र.५०/पापु-०७,दि.७ डिसेंबर, २०१२

**प्रस्तावना :**

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, राज्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा मार्च, २०१२ ते जून, २०१२ पर्यंत म्हणजेच टंचाई कालावधीत खंडीत न करणे व यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मागणी केल्यानुसार अशा पाणी टंचाईग्रस्त गावांमधील हंगामी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा करण्यासाठी जिल्हा स्तरावर आवश्यक तो निधी उपलब्ध असावा यासाठी संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र.४ येथील शासन परिपत्रकान्वये सदर उपाययोजनांना दि.३० जून,२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संदर्भाधीन दि.१७/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये ग्राम पंचायत / जिल्हा परिषदांच्या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या मागील वर्षातील वीज देयकांच्या प्रतिपूर्तीसाठी प्रोत्साहन अनुदान देण्याचे धोरण विहित करण्यात आले आहे.

सध्याची भीषण टंचाई परिस्थिती लक्षात घेता राज्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांमध्ये स्वतंत्र ग्रामीण नळ योजनेच्या वीज देयकांची अदायगी करण्यासाठी ग्रामपंचायतींना सहाय्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, वीज देयकांची अदायगी न झाल्याने त्या बंद होऊ नयेत म्हणून राज्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांच्या दि.०१ एप्रिल,२०१२ पासूनच्या चालू वीज देयकांच्या ६७ % रकमेची अदायगी महावितरण कंपनीस करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल :

१) संदर्भाधीन दि. २७/३/२०१२ व दि. ७/१२/२०१२ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांनाच टंचाईग्रस्त भागाच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेकरिता ६७ % रक्कम अदा करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद हे सदस्य तर, कार्यकारी अभियंता, महावितरण हे सदस्य सचिव आहेत.

२) ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांमधील ग्रामपंचायतींनी पाणी पुरवठा योजनांच्या वीजेच्या चालू बिलांच्या ३३ % रक्कम अदा केल्यास परिच्छेद-१ मधील समितीने त्या बिलाच्या उर्वरित ६७ % रक्कम महावितरण कंपनीस अदा करावयाची आहे. याकरिता समितीच्या बैठकीत कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी संबंधित ग्रामपंचायतींची सविस्तर माहिती सादर करावी. या समितीच्या बैठका किमान दर १५ दिवसांनी घेण्यात याव्यात. या बैठकीत ज्या ग्रामपंचायतींनी ३३ % रक्कम भरली नसेल, त्यांची माहिती समितीच्या निदर्शनास आणून त्यांना ही रक्कम भरण्याकरिता समितीच्या वतीने कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी १५ दिवसांची मुदत द्यावयाची आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी गट विकास अधिकारी व स्थानिक अधिकाऱ्यांच्या मार्फतसुध्दा तातडीने ३३ % रक्कम अदा करण्याची सूचना ग्रामपंचायतींना द्यावी. समितीच्या पुढच्या सभेपर्यंत जर त्या ग्रामपंचायतींनी ३३ % रक्कम भरली तर त्यांच्या बिलाच्या उर्वरित ६७ % रक्कम समितीने महावितरणकडे जमा करावी.

३) संदर्भाधीन शासन परिपत्रक दि. २७/३/२०१२ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सदर देयके अदा करण्यासाठी बँक खाते उघडण्यात आलेले आहे.

४) महावितरण कंपनीस अदा करावयाच्या ६७ % रकमेपैकी ५० % रक्कम जिल्हा परिषदेकडील जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीमधून तर उर्वरित १७ % रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे शासनाकडून २२४५ लेखाशीर्षाखाली प्राप्त झालेल्या रकमेतून द्यावयाची आहे.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्याकडील जिल्हा देखभाल दुरुस्ती निधी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त होणारा देखभाल दुरुस्तीसाठीचा निधी, राज्यस्तरावरुन देखभाल व दुरुस्तीसाठी प्राप्त झालेले अनुदान व जिल्हा परिषदेच्या इतर निधीमधून वीज देयकांसाठी लागणारी ५० % एवढी रक्कम जिल्हाधिकारी समितीच्या बचत खात्यामध्ये तात्काळ जमा करावी. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरण कंपनीस अदा करावयाची १७ % रक्कम २२४५ लेखाशीर्षामधून त्यांच्या बचत खात्यात जमा करावयाची आहे.

६) या शासन निर्णयान्वये महावितरणला द्यावयाची रक्कम अदा करण्याकरिता जर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असलेला देखभाल व दुरुस्ती निधी कमी पडत असेल तर त्यांनी सदर अधिकची रक्कम उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा. याप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर

जिल्हाधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध इतर तरतुदींमधून पुनर्विनियोजनाद्वारे जिल्हा परिषदेला देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व हा निधी प्राप्त झाल्यावरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या खात्यात जमा करावा. पुनर्विनियोजनाद्वारे जिल्हा नियोजन समितीला अधिकचा निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे मागणी करावी. याच प्रकारे जिल्हाधिकाऱ्यांना २२४५ लेखाशीर्षामधून १७ % रक्कम देण्याकरिता अनुदान कमी पडल्यास मदत व पुनर्वसन विभागाकडे अनुदानाची मागणी करावी. जिल्हाधिकारी यांच्या समितीकडे देण्यात आलेल्या निधीचे व महावितरणकडे अदा करण्यात आलेल्या रकमेचा हिशोब नियमितपणे ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील.

२. सदर शासन निर्णय महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग तसेच ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०७०७१८४५१४०१२८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एस. एस. संधू)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
विधानमंडळ सदस्य (सर्व)
मुख्य सचिव यांचे उप सचिव
अपर मुख्य सचिव, (महसूल वन विभाग)
प्रधान सचिव(उर्जा),उद्योग ,उर्जा व कामगार विभाग
प्रधान सचिव,ग्राम विकास व पंचायत राज
प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग
प्रधान सचिव ,नियोजन विभाग
सचिव, महसूल वन विभाग (मदत व पुनर्वसन)
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
सर्व कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७